# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# वाचन संस्कारामध्ये जीवनाला दिशा-निकम

वार्ताहर
पाटण

पुस्तक वाचत असताना मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंतचे वाचन समजून घेतले पाहिजे. व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी व्यक्तीच्या जीवनात वाचन संस्कार महत्त्वाचा असून पुस्तकाचा गंध हा आपल्या आयुष्याला सुगंधित करत असतो. वाचन हा संस्कार असून संस्कारक्षम विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा आणि आकार देण्याचे सामर्थ्य वाचन संस्कारामध्ये असल्याचे प्रतिपादन येथील नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रहार निकम यांनी केले.

येथील बाळासाहेब देसाई कॉलेज मराठी विभाग व श्री. नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण कार्यक्रमात ते बोलत होते.



पाटण : 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' कार्यक्रमात बोलताना चंद्रहार निकम. समवेत डॉ. सौ. एच. व्ही. काटे, प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे व इतर.

आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे, वाचनालयाचे संचालक डी. के. देशमुख, प्रा.डॉ. विनायक राऊत, प्रा. एस. डी. गायकवाड, प्रा. बळीराम लोहार यांची प्रमुख उपस्थिती होती.

चंद्रहार निकम म्हणाले की, 'वाचाल तर वाचाल' हा वाक्प्रचार वाचनाचा महत्वाचा संदेश देतो. वाचन करणे म्हणजे ज्ञान मिळविणे, विचार करायला शिकणे. वाचनाने व्यक्तिमत्व विकास साधता येतो.

प्रा. डॉ. सौ. एच. व्ही काटे यांनी वाचनाने विचार प्रगल्भ होतात. वाचन केल्याने मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अंतर्बाह्य विकास होतो. तसेच त्यांनी साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकातील एक प्रसंग सांगितला.

अल्मास मुल्ला, अक्षता मोरे, गुलशन सय्यद, जयश्री भिसे, नाझनीन मुल्ला, सानिका मोळावडे, सुप्रिया देसाई, मिनाज आत्तार यांनी पुस्तक परीक्षण वाचून दाखविले.